तरुण भारत

शुक्रवार, ६ मे २०२२

# शतकी व्याख्यानाने राजर्षी शाहूंना मानाचा मुजरा

## जिल्ह्यातील शंभर शाळा, महाविद्यालयांमध्ये एकाचवेळी, एकाच दिवशी शाहू कार्याचा जागर

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणाची क्रांती रूजवण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक समाजासाठी एक वसतिगृह बांधून तळागाळांपर्यंत शिक्षणाचा ज्ञानयज्ञ पोहोचवला. राधानगरी धरण बांधून करवीर संस्थान सुजलाम-सुफलाम केले. बहुजनांना न्याय देण्यासाठी कायदे तयार केलेच, परंतु प्रत्यक्ष कृतीतून सामाजिक सलोखा जपला. कोल्हापूर जिल्ह्यातील शंभर शाळा, महाविद्यालयांत शाहूंच्या जीवन कार्यावरील शंभर व्याख्यानांच्या माध्यमातून शाहू कार्याचा जागर केला. या शतकी व्याख्यानाने करवीरनगरीने शाहूंना मानाचा मुजरा केला.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्वांतर्गत राजर्षी शाहू स्मृती शताब्दी वर्षानिमिताने जिल्हाधिकारी आणि शंभर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने एकाचवेळी शंभर व्याख्यानांचे आयोजन केले होते. व्याख्यानांमध्ये अनेक शाहू अभ्यासकांनी शाहू कार्यावर विचार मांडले. तळागाळातील लोकांपर्यंत शाहूंचा विचार पोहचवावा, हा या व्याख्यानाचा उद्देश होता.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्यासह मान्यवरांची व्याख्याने शंभर महाविद्यालयात एकाचवेळी झाली. शंभर शाळा, महाविद्यालयात शाहूंच्या कार्यावर व्याख्याने झाली.

### प्रत्यक्ष कृतीतून अभिवादन करा : श्रीमंत शाहू छत्रपती



राजर्षी शाहू महाराजांचा समता व मानवतेचा विचार सर्वदूर पोहोचला पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाने शाहू विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवला पाहिजे. केंद्र व राज्य सरकारने शाहू विचारानेच आपले कार्य केले तरच खऱ्या अर्थाने शाहू महाराजांना ती आदरांजली ठरणार आहे.

### २८ वर्षात २८० वर्षाचे काम : पालकमंत्री



राजर्षी शाहू महाराजांनी २८ वर्षाच्या कारकीर्दीत २८० वर्षाचे काम केले आहे. शाहूंच्या समतेचा संदेश सर्वदूर पोहोचवावा. विविध क्षेत्रात जिल्ह्याला जगाच्या नकाशावर पोहोचवले आहे. विद्यार्थ्यांना भावनिकदृष्ट्या सक्षम करणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे.

### शाहूंनी तत्कालीन सामाजिक नकाशा बदलला : डॉ.पवार



सत्तेचा राजदंड खऱ्या अर्थाने बहुजनांच्या उध्दारासाठी वापरणारे राजर्षी शाहू महाराज एकमेव राजे होते. तत्कालीन सामाजिक नकाशा बदलण्याचे काम त्यांनी केले. बहुजन समाजाचे 'आत्मभान" शाहू महाराजांनी जागृत केले. डॉ. आंबेडकर खरे 'लोकमान्य" असल्याचे शाहू महाराजांनी सांगितले होते. त्यावेळी 'काय घडले" आणि 'का घडले" याची उदाहरणे देत शाहूंच्या संपूर्ण कार्यावर डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रकाश टाकला.

### शाहूंचा विचार अंगिकारण्याची गरज : अर्थतज्ज्ञ थोरात



लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज द्रष्टे राजे होते. तत्कालीन काळात त्यांनी समतेसाठी लढा दिला. त्यांच्या एकूणच सामाजिक, सर्वांगीण विचारांचा युवकांनी अंगिकार करावा. आधुनिक युगातही शाहूंचा विचार प्रेरणादायी असल्याने तरूणांनी शाहूंच्या विचारानुसार वर्तन केले पाहिजे, असे डॉ. यशवंतराव थोरात म्हणाले.

लोकमत
epaper.lokmat.com ६
कोल्हापूर, शुक्रवार, दि. ६ मे २०२२

# शाहूंच्या स्वप्नातील समाज घडवण्यासाठी युवांनो पुढे या

## सतेज पाटील : 'जागर शाहू कर्तृत्वाचा' १०० व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कार्य आणि विचारांचे पाईक होत त्यांनी दिलेला समतेचा संदेश आचरणात आणून शाहू विचारांचा जागर करूया. त्यांच्या स्वप्नातील बलशाली समाज, राष्ट्र घडविण्यासाठी तरुणांनी पुढे यावे, अशी साद पालकमंत्री सतेज पाटील यांनी गुरुवारी विवेकानंद महाविद्यालय येथे आयोजित व्याख्यानात घातली.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त 'जागर शाहू कर्तृत्वाचा' या विषयावर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनकार्याविषयी एकाच वेळी शंभर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. यावेळी प्राचार्य आर. आर. कुंभार, महादेव नरके, प्रा. एस. एस. अंकुशराव, डॉ. श्रुती जोशी उपस्थित होत्या.



राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वअंतर्गत आयोजित १०० व्याख्यानमालेअंतर्गत गुरुवारी पालकमंत्री सतेज पाटील यांनी विवेकानंद महाविद्यालयात व्याख्यान दिले. यावेळी प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, आर. आर. कुंभार उपस्थित होते.

शाहूराजांनी शिक्षणाची गंगा समाजाच्या तळागाळांत पोहोचविण्याचे कार्य केले. त्यामुळे या भूमीत शाहू विचारांचे समाजसुधारक घडल्याचे डॉ. अभयकुमार साळुखे यांनी सांगितले. आर. आर. कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले.

Pol 6/5/2022
PR 07/5/22